मराठवाडा नेता 12.11.25

# मोटारसायकल चोरणाऱ्या आंतरराज्य चोरट्याला अटक




नांदेड : (म नेता)

मोटारसायकल चोरी करणाऱ्या एका आंतरराज्य चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून तेलंगणा व नांदेड जिल्ह्यातून चोरलेल्या ११ मोटारसायकल जप्त केल्या आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रवी वाहुळे व त्यांचे सहकारी हे गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, बेलानगर येथील एका झुडपात मोटारसायकल ठेवल्या असल्याची गुप्त माहिती मिळाली. सहाय्यक पोलिस निरीक्षक रवी वाहुळे व त्यांचे सहकाऱ्यांनी बेलानगर येथे जाऊन संशयित आरोपी रमेश श्यामराव कायपाक यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी तेलंगणा व नांदेड जिल्ह्यातील अनेक पोलिस ठाण्याच्या हद्दीतून मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी सदर आरोपीची अधिक चौकशी केली असता त्यांनी तेलंगणा व नांदेड शहरातील शिवाजीनगर, वजिराबाद, मुदखेड, तामसा पोलिस ठाण्याच्या हद्दीतून मोटारसायकल चोरी केल्याची कबुली देत चोरीच्या ११ मोटारसायकल काढून दिल्या.

अधिक तपासासाठी सदर आरोपीला शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या ताब्यात दिले आहे. सदरील कारवाई पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलिस अधिक्षक सुरज गुरव, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उदय खंडेराय, सहाय्यक पोलिस निरीक्षक रवी वाहुळे, पोलिस उपनिरीक्षक बळीराम दासरे, माधव केंद्रे, गुंडेराव करले, दिलीपकुमार चंचलवार, विठ्ठल शेळके, गणेश लोसरवार, देविदास चव्हाण, मोतीराम पवार, मनोज राठोड, संजय राठोड सिद्धार्थ सोनसळे यांनी केली आहे.